पुढारी

# 'रवळनाथ'मध्ये सोने तारण, गृहोपयोगी उपकरणे कर्ज सुविधेस प्रारंभ



एम. एल. चौगुले

**गडहिंग्लज : पुढारी वृत्तसेवा**

येथील श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीला सोनेतारण कर्ज देण्यास केंद्रीय निबंधकांची परवानगी मिळाली असून संस्थेच्या सर्व शाखांमध्ये सोने तारण कर्ज सुविधेस प्रारंभ केला आहे, अशी माहिती संस्थाध्यक्ष एम. एल. चौगुले यांनी दिली.

चौगुले म्हणाले, गेल्या २५ वर्षांत आजअखेर संस्थेच्या अर्थसहाय्यातून सुमारे ३२०० घरकुले उभी राहिली आहेत. अनेकदा सोनेतारण कर्जाविषयी संस्थेकडे वेळोवेळी विचारणा झाली. त्यामुळेच सोने तारण कर्ज सुरू करण्यास केंद्रीय निबंधकांची परवानगी मागितली होती. यानुसार संस्थेच्या गडहिंग्लज, आजरा, चंदगड, नेसरी, कोल्हापूर, जयसिंगपूर, बेळगांव, निपाणी, कुडाळ व सुविधा केंद्र गडहिंग्लज या १० शाखेत सोनेतारण कर्जाची सुविधा उपलब्ध केली आहे.

घराचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर सोलर सिस्टीम, टीव्ही, फ्रिज आणि वॉशिंग मशिन इत्यादी अत्यावश्यक वस्तूंसाठी देखील आपल्या कर्जदारांना अन्य बँका-पतसंस्थांकडे कर्ज घ्यावे लागत होते. त्यामुळे गृहोपयोगी उपकरणांच्या खरेदीसाठी योग्य दरात कर्ज देण्याचा निर्णय संस्थेने घेतला असून त्यालाही केंद्रीय निबंधकांनी मंजुरी दिली आहे, असेही संस्थाध्यक्ष चौगुले यांनी यावेळी सांगितले.

यावेळी उपाध्यक्ष प्रा. व्ही. के. मायदेव, मुख्य कार्यकारी अधिकारी डी. के. मायदेव, सर्व संचालक, सल्लागार, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

My Kolhapur Edition
Jun 29, 2022 Page No. 9
newspaper.pudhari.co.in